Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# प्राथमिक शाळांमधील मुख्याध्यापकांना ऑनलाईन कामकाजात येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास

संशोधकाचे नाव
सोनाली दशरथ उगले
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. रश्मी जोशी
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

*सारांश–*

*डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढत्या वापरामुळे शैक्षणिक क्षेत्रातही मोठे बदल घडून आले आहेत. शासनाच्या विविध योजनांअंतर्गत शाळांमध्ये ऑनलाइन कामकाजाचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः प्राथमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांकडून प्रशासनिक, शैक्षणिक व आर्थिक कामकाजाची नोंद ऑनलाइन पद्धतीने करण्याची अपेक्षा ठेवली जाते. या बदलांमुळे पारंपरिक कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल होत असून, मुख्याध्यापकांच्या भूमिकेतही लक्षणीय परिवर्तन घडून आले आहे. मात्र, या डिजिटल संक्रमण प्रक्रियेत मुख्याध्यापकांना विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. तांत्रिक अडचणी, प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव, वेळेचे व्यवस्थापन, आणि शासनाच्या सूचनांची अंमलबजावणी यांसारख्या बाबी त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम घडवतात. या सर्व अडचणींचा चिकित्सक अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून मुख्याध्यापकांच्या कार्यात सुलभता आणता येईल आणि शैक्षणिक प्रशासन अधिक कार्यक्षम व गतिमान बनवता येईल. या अभ्यासाचा मुख्य उद्देश म्हणजे, मुख्याध्यापकांना येणाऱ्या अडचणी ओळखून त्या दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व शाळा प्रशासनाच्या डिजिटल सक्षमीकरणास हातभार लावणे होय.*

cc BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्त्वाचे शब्द** – प्राथमिक शाळा, मुख्याध्यापक, ऑनलाइन कामकाज, समस्या, चिकित्सक अभ्यास.

**संशोधन लेखाचा मुख्य भाग –**

संशोधन विषयाची पार्श्वभूमी– संशोधन समस्येचा ऐतिहासिक आढावा –सद्यस्थिती

**प्राथमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी –**

प्राथमिक शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी भारतातील शिक्षणाच्या प्रवासावर एक नजर टाकणे उपयुक्त ठरेल.

**प्राचीन भारतातील शिक्षण**

गुरुकुल प्रणाली – प्राचीन काळात भारतात शिक्षण गुरुकुल प्रणालीद्वारे दिले जात होते. विद्यार्थी गुरुकुलात राहून गुरुंकडून वेद, उपनिषदे, शास्त्र आणि विविध कलांचा अभ्यास करीत.

तक्षशिला आणि नालंदा विद्यापीठेरू हे जगप्रसिद्ध शिक्षण केंद्र होते. येथे विविध विषयांवर सखोल शिक्षण दिले जात असे.

**मध्ययुगीन भारतातील शिक्षण**

मुस्लिम राजवटीत मदरसे आणि मकतबांमध्ये धार्मिक शिक्षणासोबत गणित, खगोलशास्त्र आणि तत्वज्ञान शिकवले जाई.हिंदू धर्मशाळा आणि पाठशाळांमध्ये पारंपरिक शिक्षणावर भर दिला जात असे.

**ब्रिटिश काळातील शिक्षण**

ब्रिटिश सत्तेच्या आगमनानंतर भारतीय शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाचे बदल घडले.

वूडचा डिक्री (1854) – यामुळे भारतात आधुनिक शिक्षण व्यवस्था सुरू झाली. प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचे स्वरूप निश्चित करण्यात आले. प्राथमिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आले, परंतु इंग्रजी शिक्षणावर भर दिला गेला.

**स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण**

1947 नंतर भारत सरकारने प्राथमिक शिक्षणाला मूलभूत हक्क म्हणून मान्यता दिली.

राष्ट्रीय शिक्षण धोरणे (1968, 1986, 2020), या धोरणांद्वारे प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मोफत आणि सक्तीचे करण्यात आले. सर्व शिक्षा अभियान (2001) आणि राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (NCPCR) यासारख्या उपक्रमांमुळे मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले.

**नवीन शैक्षणिक धोरण**

मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्यावर भर

समावेशक आणि समता आधारित शिक्षण प्रणाली

शिक्षणात डिजिटल साधनांचा उपयोग.

**मुख्याध्यापकांच्या ऑनलाईन कामकाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी –**

मुख्याध्यापकांच्या ऑनलाईन कामकाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील तांत्रिक प्रगती आणि डिजिटलीकरणाचा आढावा घेणे गरजेचे आहे.

१. पारंपरिक कामकाज प्रणाली

पूर्वी मुख्याध्यापकांचे कामकाज प्रामुख्याने कागदपत्रांद्वारे केले जात असे. शाळेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि आर्थिक व्यवस्थापनासाठी विविध नोंदी ठेवण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांवर होती. हजेरीपत्रक, निकालपत्रे, विद्यार्थी प्रगती अहवाल, शिक्षकांची उपस्थिती यांसाठी हाताने नोंदी केल्या जात.

२. **तंत्रज्ञानाचा प्रवेश आणि संगणकीकरण**

२००० च्या दशकात शाळांमध्ये संगणकाचा वापर सुरू झाला.

सर्व शिक्षा अभियान SSA आणि राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान RMSA अंतर्गत अनेक शाळांमध्ये संगणक व इंटरनेट सुविधा पुरवण्यात आल्या.

मुख्याध्यापकांसाठी MS Office, Excel, आणि इतर बेसिक सॉफ्टवेअर्सद्वारे कामकाज सुलभ होऊ लागले.३. 3.ऑनलाईन पोर्टल्स आणि ई–गव्हर्नन्सए शालार्थ Shalaarth, SARAL, Systematic Administrative Reforms for Achieving Learning आणि UDISE, Unified District Information System for Education यांसारखी ऑनलाईन प्रणाली मुख्याध्यापकांच्या कामकाजात महत्त्वाची ठरली.

विद्यार्थी नोंदणी, शिक्षक माहिती, शाळेचे प्रशासन, अनुदान वितरण यांसाठी ही पोर्टल्स उपयुक्त ठरली. ऑनलाईन कामकाजामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमतेत वाढ झाली.

४. कोविड–१९ आणि डिजिटल शिक्षणाचा वेग

कोविड–१९ च्या काळात शिक्षणसंस्था बंद असल्यामुळे ऑनलाईन शिक्षण आणि कामकाजाची गरज भासली. Zoom, Google Meet, Microsoft Teams यांसारख्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग साधनांचा मुख्याध्यापकांनी आढावा बैठका, शिक्षक प्रशिक्षण, आणि पालक सभांसाठी प्रभावी वापर केला. DIKSHA आणि ePathshala यांसारख्या शिक्षण पोर्टल्सचा उपयोग वाढला.

५. **नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020)**

ऑनलाईन व्यवस्थापन आणि तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर हे नवीन शैक्षणिक धोरणाचे मुख्य घटक आहेत. मुख्याध्यापकांसाठी Capacity Building Program आणि ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आले. मुख्याध्यापकांच्या ऑनलाईन कामकाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी ही तंत्रज्ञानाच्या सततच्या प्रगतीने समृद्ध झाली आहे. डिजिटलीकरणामुळे शालेय व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि जलद झाले आहे. यामुळे मुख्याध्यापकांना निर्णय घेण्यात मदत होत असून शिक्षण व्यवस्थेचा सर्वांगीण विकास घडतो आहे.

**मुख्याध्यापकांच्या ऑनलाईन कामकाजाची सद्यस्थिती –**

मुख्याध्यापकांच्या ऑनलाईन कामकाजाची सद्यस्थिती ही तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे अधिक सुलभ आणि पारदर्शक झाली आहे. शिक्षण क्षेत्रात डिजिटल परिवर्तनामुळे मुख्याध्यापकांचे

प्रशासकीय, शैक्षणिक आणि व्यवस्थापनात्मक कामकाज वेगाने ऑनलाइन स्वरूपात रूपांतरित झाले आहे.

१. **प्रशासकीय कामकाज**

UDISE (Unified District Information System for Education) शाळांची माहिती, विद्यार्थीसंख्या, शिक्षक संख्या आणि भौतिक सुविधा यांचा ऑनलाईन डेटा ठेवला जातो. Shala Siddhi आणि Shaala Darpan शाळेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मुख्याध्यापक या प्लॅटफॉर्मचा उपयोग करतात.

HRMS - शिक्षकांच्या सेवा नोंदी, वेतन बिलिंग, प्रमोशन आणि इतर प्रशासकीय प्रक्रिया ऑनलाईन स्वरूपात पार पडतात.

२. **शैक्षणिक व्यवस्थापन**

DIKSHA आणि NISHTHA – शिक्षकांसाठी ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम आणि शिक्षणसामग्री उपलब्ध करून देणारे प्लॅटफॉर्म. मुख्याध्यापक या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख करतात.

Academic Monitoring – मुख्याध्यापक ऑनलाइन टेस्ट मॉड्यूल्स, विद्यार्थ्यांच्या निकालांचे विश्लेषण आणि शिक्षण पद्धतींचा आढावा घेऊ शकतात.

३. **पालक आणि समुदाय सहभाग**

WhatsApp आणि Google Meet: पालक–शिक्षक सभा, विद्यार्थी सल्लामसलत आणि शालेय उपक्रमांची माहिती देण्यासाठी मुख्याध्यापक ऑनलाईन माध्यमांचा वापर करतात.

Shala Siddhi Reports - पालकांना शाळेच्या प्रगतीची माहिती ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध होते.

४. आर्थिक व्यवस्थापन

PFMS (Public Financial Management System) शाळांसाठी मिळणाऱ्या सरकारी निधीचे ऑनलाइन व्यवस्थापन. मुख्याध्यापकांना निधीचा वापर कसा होतो यावर देखरेख ठेवता येते. GeM (Governmente & Market place) शाळेसाठी आवश्यक सामग्रीचे खरेदी व्यवहार ऑनलाईन केले जातात. सध्याच्या परिस्थितीत मुख्याध्यापक ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून शाळेच्या प्रशासनाचे डिजिटल नेतृत्व करत आहेत. हे तंत्रज्ञान शिक्षणाच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रभावी ठरत असून शाळा व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि परिणामकारक झाले आहे. परंतु हे कामकाज करत असताना मुख्याध्यापकांना अनेक आव्हानांना

व समस्यांना सामोरे जावे लागते.

५. **आव्हाने आणि सुधारणा**

इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव ग्रामीण भागात अद्याप एक मोठे आव्हान आहे. सर्व

मुख्याध्यापकांना तांत्रिक कौशल्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. डेटा सुरक्षा आणि गोपनीयता यासाठी अधिक प्रभावी प्रणालींची आवश्यकता आहे. प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांना अशा विविध समस्यांना किंवा आव्हानांना पावलोपावली सामोरे जावे लागत असल्यामुळे संशोधकाने वरील समस्या निवडली आहे.

8. संदर्भसूची –

1. नरवणे मीनल (2006) भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या– पुणे –नित्य नूतन प्रकाशन.
2. भिंताडे. वि. रा. (2007) भारतीय आधुनिक शिक्षणरू समस्या आणि उपाय–पुणे – श्री विद्या प्रकाशन.
3. नागतोडे किरण (1997) शालेय व्यवस्थापन, शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाह–नागपूर– विद्या प्रकाशन.

वेबसाईट –

1 http://shodhganga-inflibnet-ac-in
2 http://en-wikipedia-org